Peer reviewed Journal Impact Factor:7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

*Multidisciplinary International Level Referred Journal*

**December-2021 Volume-12 Issue-26**

## *Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

**Chief Editor**
**Dr. R. V. Bhole**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

**Editor**
Mr. Shashikant Jadhawar
I/C, Principal,
Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,
Kalamb, Dist. Osmanabad (MS) India

**Executive Editor**
**Dr. Anant Narwade**
**Dr. Raghunath Ghadge**
**Mr. Anil Jagtap**



**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

**December-2021 Volume-12 Issue-26**

*On*

# Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

| Chief Editor | Editor |
|---|---|
| **Dr. R. V. Bhole**<br>'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102 | Mr. Shashikant Jadhawar<br>I/C, Principal,<br>Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,<br>Kalamb, Dist. Osmanabad (MS) India |

**Executive Editor**
**Dr. Anant Narwade**
**Dr. Raghunath Ghadge**
**Mr. Anil Jagtap**

EDITORIAL BOARD

| | | |
|---|---|---|
| **Prof. R. J. Varma ,Bhavnagar [Guj]**<br>**Dr. D. D. Sharma, Shimla [H.P.]**<br>**Dr. Abhinandan Nagraj, Benglore[K]**<br>**Dr. Venu Trivedi ,Indore[M.P.]**<br>**Dr. Chitra Ramanan Navi ,Mumbai[M.S]** | **guyen Kim Anh, [Hanoi] Virtnam**<br>**Prof. Andrew Cherepanow, Detroit, Michigan [USA]**<br>**Prof. S. N. Bharambe, Jalgaon[M.S]**<br>**Dr. C. V. Rajeshwari, Pottikona [ AP]**<br>**Dr. S. T. Bhukan, Khiroda[M.S]** | **Dr. R. K. Narkhede, Nanded [M.S]**<br>**Prof. B. P. Mishra, Aizawal [Mizoram]**<br>**Prin. L. N. Varma ,Raipur [ C. G.]**<br>**Prin. A. S. Kolhe Bhalod[M.S]**<br>**Prof.Kaveri Dabholkar Bilaspur [C.G]** |

**Published by-** Mr. Shashikant Jadhawar, I/C, Principal, Chhatrapati Shivaji Mahavidyalaya, Kalamb, Dist. Osmanabad (MS) India

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

| | | |
|---|---|---|
| 36 | महात्मा फुले यांचे कृषि विकासविषयक चिंतन<br>डॉ.जयदेवी पवार | 117-119 |
| 37 | प्रेरणाप्रद चरित्र : राष्ट्रपुरुष छत्रपति शाहू महाराज<br>प्रा. डॉ. बंग नरसिंगदास ओमप्रकाश | 120-121 |
| 38 | थोर समाज सुधारक राजर्षी छत्रपती शाहू महाराज<br>डॉ.सुधीर ब गायकवाड | 122-125 |
| 39 | हिंदी उपन्यास और दलित जीवन<br>डॉ. सय्यद अमर फकीर | 126-128 |
| 40 | महिलांचे प्रश्न आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर<br>प्रा.डॉ घोलप के जी | 129-131 |
| 41 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार<br>डॉ. घन आनंद लक्ष्मीकांत | 132-136 |
| 42 | थोर समाजशास्त्रज्ञ, सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष:राजर्षी शाहु महाराज<br>डॉ. हिराचंद्र रोहिदास मोरे | 137-141 |
| 43 | सामाजिक क्रांतीचे प्रणेते : महात्मा जोतीबा फुले<br>प्रा. डॉ. अभिमन्यू गेना ओहळ | 142-145 |
| 44 | महात्मा फुले यांचे शेती व शेतकऱ्याविषयाचे सद्यस्थितीशी पूरक असे विचार<br>प्रा.डॉ.मधूकर बाबूराव अनंतकवळस | 146-151 |
| 45 | छ. शाहू महाराजांचे आरक्षण धोरण आणि सद्यस्थिती<br>डॉ.दत्ता कुंचेलवाड | 152-154 |
| 46 | प्रजातंत्र भारत में विद्रोह का आगाज :आंबेडकरवाद<br>डॉ.सुरेश शेळके | 155-157 |
| 47 | राजर्षी शाहु महाराजाच्या कृषि विषयक विचाराचे विश्लेषण<br>प्रा. डॉ. ज्ञानेश्वर आनंदराव पुपल्वाड | 158-159 |
| 48 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजकिय विचार<br>डॉ.प्रा.लोखंडे बी.बी. | 160-162 |
| 49 | महात्मा ज्योतिबा फुले मराठी साहित्यातील क्रांतीयोद्धा<br>प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत | 163-166 |
| 50 | राजर्षी शाहू महाराज : सामाजिक समता व न्यायाचे पुरस्कर्ते<br>प्रा. डॉ. नवनाथ राजाराम दणाणे | 167-171 |
| 51 | राजर्षी शाहू महाराज : एक समाजसुधारक<br>प्रा. नीलेश सर्जेराव साळवे | 172-174 |
| 52 | राजर्षी शाहु महाराजांचे आर्थिक व सामाजिक योगदान<br>प्रा. डॉ साबळे बालाजी आनंदा | 175-176 |
| 53 | राजर्षी शाहू महाराज यांनी केलेल्या प्रशासकीय सुधारणा<br>श्री नवथर सोपान लक्ष्मण | 177-179 |
| 54 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य<br>आवारे प्रतिक चंद्रसेन | 180-182 |

# राजर्षी शाहू महाराज : सामाजिक समता व न्यायाचे पुरस्कर्ते

**प्रा. डॉ. नवनाथ राजाराम दणाणे**
प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी
ई.मेल. nrdanane@gmail.com

**प्रास्ताविक**

भारतातील सामाजिक समता व न्यायाचा पुरस्कार करणारा एक समाजसुधारक राजा म्हणून शाहू महाराजांना ओळखले जाते. भारताच्या इतिहासात अनेक अंगाने क्रांतिकारक ठरलेल्या, विसाव्या शतकाची सुरुवातच शाहू महाराजांनी सुरु केलेल्या सामाजिक सुधारणांपासून झालेली दिसते. शाहू महाराज विसाव्या शताकातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक व प्रशासकीय परिवर्तनाचे जनक ठरतात. त्यांनी आपली सबंध राजवट बहुजनांबरोबरच दलित, भटक्या, विमुक्तांच्या सामाजिक पुर्नत्थानासाठी राबविली. त्यांनी आपल्या सबंध राजकीय कारकीर्दीमध्ये सामाजिक समता व न्यायाचा हिरहिरीने पुरस्कार केला आहे. शाहू महाराजांचे सबंध जीवनकार्यच समता व मानवतेच्या ध्येयाने झपाटलेले होते. शाहू महाराज अनेक प्रकारच्या सामाजिक सुधारणा राबविताना, अस्पृश्यता व जातिभेद नष्ट करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करताना दिसतात. जातिभेद व अस्पृश्यता निवारणाबरोबरच भटक्या व विमुक्त जातीच्या पूर्नत्थानाचीही जबाबदारी जाणीवपूर्वक स्वीकारतात. शाहू महाराज संपूर्ण बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी निष्ठापूर्वक प्रयत्न करतात. ज्या मानवी जातीसमुहांचे माणूसपण नाकारण्यात आले होते. ज्यांना अस्पृश्यतेसारख्या अमानवी प्रथेच्या माध्यमातून बहिष्कृत केले होते, ज्यांना समाजसमूहाच्या बाहेर ढकलून गुन्हेगार ठरविले होते. अशा भटक्या विमुक्त जाती-जमातींना राजाश्रय देण्याचे महान कार्यही पार पाडतात. हजारो वर्षापासून शोषित, वंचित ठरलेल्या समाज घटकांना शाहू महाराज मानवी हक्क व अधिकार बहाल करताना दिसतात.

## सामाजिक समता व न्यायाच्या तत्वाचा अवलंब

शाहू महाराजांनी भारताची राज्यघटना अंमलात येण्याअगोदर 50 वर्षापूर्वीच 1902 साली आरक्षणाच्या तत्वाचा अवलंब व पुरस्कार केला होता. आपल्या संस्थानामध्ये प्रशासनातील 50% जागा मागासलेल्या जातीवर्गासाठी आरक्षित करतात. त्याचबरोबर त्यांची शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी, 1908 साली अस्पृश्यांसाठी खास वसतिगृह स्थापन केले. शाहू महाराज 1918 मध्ये अस्पृश्यता निवारणाचा जाहिरनामा प्रसिध्द करतात. अस्पृश्यता निर्मूलनाचा कार्यक्रम अधिक तीव्र करताना, 28 सप्टेंबर 1919 रोजी एक आज्ञादेश काढून अस्पृश्यांसाठी स्वतंत्र असणाऱ्या शाळा बंद करून, त्यांना सार्वजनिक शाळेत प्रवेश देण्याचे जाहिर करतात. शिक्षणामध्ये आर्थिक अडचण येवू नये म्हणून, अस्पृश्य समाजातील मुला-मुलींसाठी शिष्यवृत्त्या सुरु करतात.

## अस्पृश्योध्दाराचे कृती कार्य

1918 पासून पुढे शाहू महाराजांचे अस्पृश्योध्दाराचे कार्य अधिकच गतिमान होताना दिसते. अस्पृश्यतेचे समूळ उच्चाटन करण्यासाठी 1 जानेवारी 1919 रोजी शाहू महाराज पुढील आदेश काढतात, "कोल्हापूर इलाख्यातील रेव्हिन्यू ज्युडिशियल आदिकरुन सर्व अधिकाऱ्यांनी आमच्या संस्थानात जे अस्पृश्य नोकरी धरतील, त्यांना प्रेमाने व समतेने वागविले पाहिजे. जर कोणा अधिकाऱ्यांची वरीलप्रमाणे अस्पृश्यांना वागविण्याची इच्छा नसेल, त्याने हा हुकूम पोहोचल्यापासून सहा आठवड्यांच्या आत नोटीस देऊन राजीनामा द्यावा. त्याला पेन्शन मिळणार नाही.

स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार

सतत समतेचा व मानवतेचा आग्रह धरणारे शाहू महाराज स्त्री स्वातंत्र्याचाही जोरदार पुरस्कार करताना दिसतात. महात्मा फुले यांनी सुरु केलेल्या स्त्री उध्दाराच्या चळवळीस शाहू महाराज अधिक बळ देतात. स्त्रीयांना त्यांचे हक्क व अधिकार प्रदान करण्यासाठी शाहू महाराज आपल्या संस्थानात अनेक कायदे लागू करतात. जुलै 1917 मध्ये त्यांनी विधवांच्या पुनर्विवाहास मान्यता देणारा कायदा लागू केला. तर 12 जुलै 1919 रोजी आंतरजातीय विवाहाचा कायदा संमत केला. त्यानंतर 2 ऑगस्ट 1919 रोजी स्त्रीयांच्या छळास प्रतिबंध करणारा कायदा जारी केला. "एकूण 11 कलमांच्या या कायद्यान्वये स्त्रीला क्रूरपणाची वागणूक देणाऱ्या अपराध्यास सहा महिन्यांचा कारावास व 200 रुपयांपर्यंत दंड अशी शिक्षा देण्याची तरतूद केली गेली होती."[14] स्त्रीयांच्या छळास प्रतिबंध करण्यासाठी व त्यांना समानतेच्या पातळीवर वागविण्यासाठी शाहू महाराजांनी घेतलेला हा निर्णय म्हणजे स्त्री स्वातंत्र्याच्या दिशेने टाकलेले एक क्रांतिकारी पाऊल होते. पुढे घटस्फोट व हिंदू वारशाच्या कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा मंजूर करून, करवीर सरकारच्या गॅझेटमध्ये 17 जानेवारी 1920रोजी प्रसिध्द करण्यात आला. त्याचबरोबर देवदासी प्रतिबंधक कायदाही संमत करण्यात आला. तर स्त्री उन्नतीच्या दृष्टीने जाचक ठरणाऱ्या बालविवाह, शिक्षणबंदीसारख्या प्रधानांनाही ते विरोध करतात.

निष्कर्ष / समारोप

वरील महाराजांच्या एकूण सामाजिक समता व न्यायाच्या कार्याचा आढावा घेतल्यानंतर थोडक्यात, आपण अशा निष्कर्षपर्यंत येतो की, शाहू महाराजांनी घडवून आणलेल्या सामाजिक सुधारणा आणि समता व न्यायासाठी त्यांनी केलेले कार्य या सर्व गोष्टींचा विचार केला असता असे दिसते की, शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने मानवतावादी लोकशाही राजे होते. म्हणूनच भारताच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासाला कलाटणी देणारा एक समाजसुधारक, क्रांतिकारक राजा म्हणून त्यांचा गौरव करणे जास्त उचित ठरते. शाहू महाराजांनी सामाजिक समता व न्यायाच्या तत्वाचा केलेला प्रत्यक्ष अवलंब, अस्पृश्योध्दाराचे केलेले कृतीकार्य, अस्पृश्यता व जातिभेदाची त्यांनी केलेली प्रखर निर्भत्सना, त्यांची स्वराज्य विषयक नैतिक व बंडखोर भूमिका, त्यांनी केलेली शैक्षणिक क्रांती, त्यांनी केलेला स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार आणि एकूणच सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि प्रशासकीय पातळीवरील प्रत्यक्ष कृती कार्याचा विचार करता, शाहू महाराज सामाजिक समता व न्यायाचे खऱ्या अर्थाने पुरस्कर्ते ठरतात.

**संदर्भ सूची :-**

1. संपा. डॉ. जयसिंगराव पवार : 'राजर्षी शाहू महाराज स्मारक ग्रंथ'
2. महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर,
3. द्वितीयावृत्ती : 26 जून 2007 पृ. कृर. 81
4. तत्रैव : प्र. क्र. 859
5. तत्रैव : प्र. क्र. 925
6. तत्रैव : प्र. क्र. 95
7. तत्रैव : प्र. क्र.95
8. तत्रैव : प्र. क्र.95
9. तत्रैव : प्र. क्र. 95
10. तत्रैव : प्र. क्र.855
11. तत्रैव : प्र. क्र.847
12. तत्रैव : प्र. क्र. 819
13. तत्रैव : प्र. क्र.818
14. तत्रैव : प्र. क्र. 846, 847
15. तत्रैव : प्र. क्र. 851
16. तत्रैव : प्र. क्र. 114

| Chief Editor | Editor |
|---|---|
| **Dr. R. V. Bhole**<br>'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102 | Mr. Shashikant Jadhawar<br>I/C, Principal,<br>Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,<br>Kalamb, Dist. Osmanabad (MS) India |

**Executive Editor**
**Dr. Anant Narwade**
**Dr. Raghunath Ghadge**
**Mr. Anil Jagtap**

## Editorial Board

Prof. R. J. Varma ,Bhavnagar [Guj]
Dr. D. D. Sharma, Shimla [H.P.]
Dr. Abhinandan Nagraj, Benglore[K]
Dr. Venu Trivedi ,Indore[M.P.]
Dr. Chitra Ramanan Navi ,Mumbai[M.S]
guyen Kim Anh, [Hanoi] Virtnam
Prof. Andrew Cherepanow, Detroit, Michigan [USA]
Prof. S. N. Bharambe, Jalgaon[M.S]
Dr. C. V. Rajeshwari, Pottikona [ AP]
Dr. S. T. Bhukan, Khiroda[M.S]
Dr. R. K. Narkhede, Nanded [M.S]
Prof. B. P. Mishra, Aizawal [Mizoram]
Prin. L. N. Varma ,Raipur [ C. G.]
Prin. A. S. Kolhe Bhalod[M.S]
Prof.Kaveri Dabholkar Bilaspur [C.G]

**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102